World Wide Journal of Multidisciplinary Research and Development

World Wide Journal of Multidisciplinary Research and Development

WWJMRD 2017; 3(5): 67-68
www.wwjmrd.com
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''रेव्ह.एच.जी.हावर्ड:-मराठी मिशनरी''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
Rev. Howard's life is an inspiration to Christians and non-Christians across Maharashtra. and made a role model for the growth of the missionary movement in Maharashtra. Rev. Vishwasrao Satralkar says, “Rev. Howard is a great saint. How great to have the opportunity to serve you.” Rev. Getting closer to Howard means being in touch with God. This is an invaluable opportunity to serve God who is always with him. That's why Raghunath Patil says, "Rev. Howard is from our country." He was right as Rev. Howard had completely adjusted himself to Maharashtra.
" Testimony of people about Rev. Howard Rev. Howard "was one of the best missionaries of all time. Rev. Howard was merged into Christ on November 22, 1967. Dr. Weldman played the song "Crown, Lamb's Head" on a trumpet at Mirage Cemetery ... a Role in the Important Missionary Movement Congratulations to Henry George Howard for his work.

**Keywords:** Rev, Marathi, Christ, God, Gospel, Howard, Love, Christians, Maharashtra, Christian

**प्रस्तावना:**
रेव्ह हावर्ड यांचे जीवन संपूर्ण महाराष्ट्रासाठी ख्रिस्ती आणि ख्रिस्तीतेर लोकांसाठी एक प्रेरणा आहे.भाषेत मराठीवर प्रभुत्व,पवित्रशास्त्राच्या ज्ञानात पारंगत,ख्रिस्ताची सुवार्ता संपूर्ण दिवसभरात देने,लोकांची गाराने ऐकून त्याची मदत करणे,रेव्ह हावर्ड यांनी ख्रिस्ती मिशनरी कसा  असतो याचे प्रत्यय ख्रिस्ती समाजातल्या लोकांना आणून दिले.आणि एक महाराष्ट्रात मिशनरी चळवळी वाढावी म्हणू एक आदर्श निर्माण करून दिला. रेव्ह विश्वासराव सत्राळकर म्हणतात "रेव्ह हावर्ड हे अंत्यत थोर संत पुरुष आहेत तुम्हाला त्यांच्याबरोबर सेवा करण्याची संधी लाभली हे किती छान झाले." रेव्ह हावर्ड यांचे सानिध्य लाभणे म्हणजे देवाचा सहवास लाभणे त्याच्यासोबत देवाच्या अस्तिवाच्या नेहेमी भास होतो त्यांच्याबरोबर सेवा करणे ही अमूल्य संधी आहे.म्हणून रघुनाथ पाटील म्हणतात "रेव्ह हावर्ड आमच्या देशातले आहेत." त्यांचे म्हणेन रास्त होते कारण रेव्ह हावर्ड यांनी स्वतःला पूर्णतः महाराष्ट्रात सामावून घेतले होते.
त्यांच्या मराठी भाषेतील विद्ववतेबद्धल रावबहादूर आठवले लिहितात "मराठी भाषिकांनी योग्य शब्दरचनेबद्धल डॉ हावर्ड यांचा सल्ला घ्यावा." मराठी वर हावर्ड यांचे प्रेम खूपच होते म्हणून ते स्वतः म्हणतात मी मराठीत स्वप्ने पाहतो,प्रार्थना करतो, पुस्तके वाचतो,संदेश देतो.ते ख्रिस्ताचे चमकणारे दूत होते.डॉ पारखे म्हणतात "जे सुज्ञ असतील ते अंतराळीच्या प्रकाशासारखे झळकतील पुष्कळ लोकांस धर्मीकतेकडे वाकविणारे लोक युगानुयुग ताऱ्याप्रमाणे चमकतील." रेव्ह हावर्ड यांचा कार्याचा प्रकाश आजही महाराष्ट्रात त्यांच्या कार्याने ख्रिस्ती मिशनरी चळवळीत प्रकाशित होते आहे,अनेक मंडळ्या त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन ख्रिस्ताचे कार्य अविरतपणे करत आहे.
रेव्ह हावर्ड यांच्या जन्म कैनेडा येथील टोरोंटो जवळ असलेल्या लंडीज लेन येथे २२ नोव्हे १८७७ रोजी झाला. प्रिस्टन ईश्वरविज्ञान शाळेत शास्त्राचे शिक्षण पूर्ण करून एक पाळक म्हणून दीक्षा घेतली.पुढे ते मिशनरी म्हणून १९०७ साली भारतात आले."देवाने नेमलेला सुवार्तिक,एक सुवार्तिक कोण असतो? "ज्याने स्वतःचा पूर्णतः परित्याग करून आपले सर्वस्व ख्रिस्ताला वाहिलेले असते.ज्याने स्वतःचा देश, वंश,प्रदेश आणि राष्ट्रवाद त्यागून दुसऱ्या परकीय प्रांतात जाऊन आपल्या  जीवनाचे सर्वस्व कण वेचून द्यावे,याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात आलेले हेन्री जॉर्ज हावर्ड."रेव्ह हावर्ड आपल्या ट्रेजरी मेमोरीअज या आठवणी ग्रंथात म्हणतात."माझ्या आयुष्यात अनेकदा दुःख आणि  निराशा पदरात पडली हे खरे आहे.पण त्याजबरोबर सुख आणि समाधान प्राप्त झाले हेही विसरता कामा नये.या सर्व

**Correspondence**:
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

बऱ्यावाईट अनुभवातून आयुष्य कंठीत असता परमेश्वराने आपल्या कृपेचा गौरवी मुकुट माझ्या मस्तकी ठेवला असेच मला म्हणावेसे वाटते.अशा रीतीने मी माझ्या गत आयुष्याकडे नजर टाकतो,तेव्हा स्वर्गीय पित्याने माझ्यावर केलेल्या प्रेमाच्या अनुग्रहामुळे मी कृतज्ञेच्या भावनेने भारावून जातो''.एक सुवार्तिक आपले जीवन देवाच्या कृपेने व्यतीत करून आपले जीवित कार्य पूर्ण करतो.आणि त्यासाठी प्रेम ही प्रथम अट आहे,रेव्ह हावर्ड यांचे भारतावरील प्रेम त्यांना सर्वोच शिखरावर नेऊन ठेवते.म्हणून रेव्ह हावर्ड म्हणतात, *सुवार्तेचे गौरवी मुकुट भारत देशाच्या माध्यमातून देवाने माझ्यावर ठेवले आणि तेच माझे कर्तव्य आणि प्रेम आहे.

रेव्ह हावर्ड यांची वैशिष्ट्य म्हणजे ग्रीक भाषेत प्राबल्य,उत्तम ख्रिस्ती पुस्तके विकत घेऊन वाचत,ज्या प्रदेशात सुवार्ता द्यावी तेथील भाषा अवगत केली:-मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून साहित्य लिखाण केले,सकाळी पहाटेपासून सुवार्ता प्रचाराची सवय,जीवनाचा अंतिम काळापर्यंत,शिस्त प्रिय जीवन:-आणि मंडळीत ती त्यांनी उत्तम प्रकारे लावून दिली.मराठी भाषेबद्दल आपले प्रेम व्यक्त करताना ते लिहितात."मराठी भाषा मला अत्यंत प्रिय आहे.मी मोठया आवडीने ती वाचतो,मी मराठीतून विचार करतो,प्रार्थना करतो व मला मराठीतून स्वप्नेदेखील पडतात."रेव्ह हावर्ड बद्दल लोकांची साक्षी म्हणजे "जे कोणी चांगले मिशनरी होऊन गेले त्यापैकी रेव्ह हावर्ड हे एक होते".२२ नोव्हेंबर १९६७ ला रेव्ह हावर्ड ख्रिस्तात विलीन झाले डॉ वेल्डमन यांनी मिरज येथील दफनभूमीत तुतारीवर "मुकुट चढवा,कोकऱ्याच्या शिरी" हे गीत वाजविले...मिशनरी चळवळीत महत्वपूर्ण भूमिका विशद करणाऱ्या हेन्री जॉर्ज हावर्ड यांना त्याचा कार्याबद्दल सलाम.

**संदर्भसूची:-**

1. आमरण सुवार्तीक,रेव्ह एच जी हावर्ड,हावर्ड प्रकाशन,मिरज.
2. महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशन्सचा इतिहास,रेव्ह.बी.सी.भोसले.इम्मनुएल प्रकाशन,पुणे